*Shri ShardaBhavan Education Society's*

# RAJIV GANDHI MAHAVIDYALAYA

MUDKHED, DIST. NANDED (Maharashtra)

Accredited by NAAC with 'B' Grade

Department of Cultural

## निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक

भारताची माजी केंद्रीय गृहमंत्री श्रद्धेय डॉ.शंकररावजी चव्हाण साहेब यांच्या जयंतीनिमित्त श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे आय टी एम कॉलेज नांदेड यांनी महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धा सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली होती. स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविलेला होता.निबंधाचा विषय "मराठवाड्याचे भगीरथ लोकनेते कै. डॉ. शंकररावजी चव्हाण" असा होता. या स्पर्धेत प्राचार्य डॉ. ए टी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राजीव गांधी महाविद्यालयाचे चार विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत कुमारी गायत्री कालिदास पांचाळ (बी ए तृतीय वर्ष )या विद्यार्थिनीस प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आय टी एम कॉलेज नांदेड येथे बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव माननीय श्री रावसाहेब शेंदारकर आणि कार्यकारणी सदस्य तथा भाऊराव चव्हाण साखर कारखान्याचे चेअरमन माननीय नरेंद्रदादा चव्हाण, आय टी एम नांदेड चे प्राचार्य एम एम बोकारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

राजीव गांधी महाविद्यालयास प्रथम बक्षीस मिळाल्यामुळे श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव माननीय श्री डी पी सावंत साहेब, कोषाध्यक्ष ॲड. उदयरावजी निंबाळकर सर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए टी शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.डी एच मेहत्रे, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन केले.

Co-ordinator
Dr.D.H.Mhetre
**Head,
Dept.of Political Science,
Rajiv Gandhi Mahavidyalaya,
Mudkhed,Dist.Nanded.**

Principal
Dr. A.T. Shinde
**PRINCIPAL
Rajiv Gandhi Mahavidyalaya
Mudkhed,Dist.Nanded**

# Photography:



प्रथम पारितोषिक प्राप्त पांचाळ गायत्री यांना प्रमाणपत्र वाटप करताना श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव माननीय रावसाहेब शेंदारकर कार्यकारणी सदस्य पांडुरंग पावडे नरेंद्र दादा चव्हाण




प्रथम पारितोषिक प्राप्त पांचाळ गायत्री यांना प्रमाणपत्र वाटप करताना श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव माननीय रावसाहेब शेंदारकर कार्यकारणी सदस्य पांडुरंग पावडे नरेंद्र दादा चव्हाण



महाविद्यालयात सत्कार करताना प्रथम पारितोषिक प्राप्त कुमारी गायत्री पांचाळ प्राचार्य डॉ.ए टी शिंदे आणि प्रमुख पाहुणे डॉ अजय गव्हाणे, डॉ डी एच मेहत्रे



आधुनिक केसरी

16 Jul 2025

https://www.adhunikkesari.com/epaper/news/70183/68766f121a98a

## रान पेटवण्याऐवजी रान भिजवून डॉ. शंकरराव चव्हाण यांनी ऐतिहासिक कृषी क्रांती घडवली : डॉ. अजय गव्हाणे

आधुनिक केसरी न्यूज

प्रा.डॉ. शिवदास हमंद

मुदखेड : "महाराष्ट्राला सुजलाम-सुफलाम बनवण्याचे स्वप्न मनात बाळगून श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांनी आपले संपूर्ण जीवन महाराष्ट्राच्या जडणघडणीत व्यतीत केले. त्यांनी केवळ राजकारणात सक्रिय राहून नव्हे, तर जलसिंचनाच्या योजनांतून रान पेटवण्याऐवजी रान भिजवून शेतीसाठी ऐतिहासिक क्रांती घडवली," असे गौरवोद्गार यशवंत महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अजय गव्हाणे यांनी काढले. राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित शंकरराव चव्हाण जयंती निमित्त "श्रद्धेय डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या विचारांची प्रासंगिकता" या विषयावर विशेष व्याख्यान कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिकून मोठ्या पदावर विराजमान होऊन देशाची सेवा करावी. हे स्वप्न श्रद्धेय शंकररावजी चव्हाण यांनी पाहिले त्यांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयातर्फे विविध गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातून बी. ए. प्रथम वर्षात सर्वप्रथम म्हणून वैष्णवी साईनाथ गंगातीर, बी. ए. द्वितीय वर्षात सर्वप्रथम म्हणून नाझिया पठाण बी. ए. तृतीय वर्षात सर्वप्रथम म्हणून निकिता पवार, बी. एस्सी. प्रथम वर्षात सर्वप्रथम म्हणून समृद्धी हामंद, बी. एस्सी. द्वितीय वर्षात सर्वप्रथम म्हणून सलोनी हनुमंते, बी. एस्सी. तृतीय वर्षात सर्वप्रथम म्हणून साक्षी महाद्वाड, बी. कॉम. प्रथम वर्षात सर्वप्रथम म्हणून शुभांगी पवार, बी. कॉम. द्वितीय वर्षात सर्वप्रथम म्हणून पल्लवी होळकर, आणि बी. कॉम. तृतीय वर्षात सर्वप्रथम वैष्णवी काचावार यांना रोख 1100/- रुपये शिष्यवृत्ती आणि पारितोषिक तसेच प्रमाणपत्र देऊन त्यांच्या पालकासहित त्यांचा गौरव करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात बोलताना प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांनी श्रद्धेय डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा व जीवनाचा आदर्श घेऊन आपले जीवन घडवावे असा संदेश दिला.

या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दत्ताजी मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी गायत्री पांचाळ यांनी केले. तर बी. एस्सी. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. कादंबरी चौदंते यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोदातीर समाचार
epaper.godateer.com
17 Jul 2025 - Page 3

# राजीव गांधी महाविद्यालयास निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक

**नांदेड (प्रतिनिधी) –** भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे आयटीएम कॉलेज नांदेड यांनी महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत राजीव गांधी महाविद्यालयाला प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

या स्पर्धेत प्राचार्य डॉ. ए टी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राजीव गांधी महाविद्यालयाचे चार विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत कुमारी गायत्री कालिदास पांचाळ (बी.ए. तृतीय वर्ष) या विद्यार्थिनीस प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयटीएम कॉलेज नांदेड येथे बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव रावसाहेब शेंदारकर आणि कार्यकारणी सदस्य तथा भाऊराव चव्हाण साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, आयटीएम नांदेडचे प्राचार्य एम. एम. बोकारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.



राजीव गांधी महाविद्यालयास प्रथम बक्षीस मिळाल्यामुळे श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी.पी. सावंत, कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.डी एच मेहत्रे, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन केले.

देशोन्नती
वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

# राजीव गांधी महाविद्यालयास निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक



देशोन्नती वृत्तसंकलन

**मुदखेड :** माजी केंद्रीय गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे आयटीएम कॉलेज नांदेड यांनी महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांसाठी 'मराठवाड्याचे भगीरथ लोकनेते कै. डॉ. शंकररावजी चव्हाण' ह्या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत प्राचार्य डॉ. ए टी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राजीव गांधी महाविद्यालयाचे चार विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत कु. गायत्री कालिदास पांचाळ या विद्यार्थिनीस प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव रावसाहेब शेंदारकर, कार्यकारणी सदस्य तथा भाऊराव चव्हाण साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, आयटीएमचे प्राचार्य एम. एम. बोकारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

राजीव गांधी महाविद्यालयास प्रथम बक्षीस मिळाल्यामुळे संस्थचे सचिव डी. पी. सावंत, ॲड. उदयराव निंबाळकर, प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे, डॉ.डी. एच. मेहत्रे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले. (ता.प्र.)

Nanded Edition
Jul 17, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

## CERTIFICATE

OF APPRECIATION

In the essay competition on

" MARATHWADYACHE BHAGIRATH: LOKNETE LATE DR.SHANKARRAOJI CHAVAN"

organized by SSBES' Institute of Technology and Management, Nanded

THIS CERTIFICATE IS PROUDLY PRESENTED TO THE WINNER

*Gayatri Kalidas Panchal*

Hopefully, this achievement will be the first step towards bigger success. keep trying and give your best.

Dr. M. M. Bokare
I/C Director,
SSBES' ITM, Nanded

14/07/2025

Dr. Anagha K. Joshi
Coordinator
SSBES' ITM, Nanded

Shri ShardaBhavan Education Society's

## RAJIV GANDHI MAHAVIDYALAYA

MUDKHED, DIST. NANDED (Maharashtra)
Accredited by NAAC with 'B' Grade
Email.Id- principalrgm169@gmail.com Telephone No. (02462) 275868
Reg.No. NGC2001/NMV/(01/2001)M.S. Dt.29 June 2001

| | | | |
|---|---|---|---|
| ...n. Ashokraoji Chavan<br>B.Sc. M.B. A | Sow.AmitaAshokrao Chavan | Hon.D.P. Sawant<br>B.Sc. Honors | Dr. A. T. Shinde<br>M. A. B. Ed. SET, M.Phil.,Ph.D.,<br>Mob.No. 9922653020 |
| President | Vice-President | Secretary | Principal |

...No: - RGM / 2025-26/ 184 — Date: 10/07/ 2025 — 11.07.20...

प्रति,
मा.प्राचार्य
आय टी एम कॉलेज
नांदेड.

विषयः श्रद्धेय कै. डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेत विद्यार्थी सहभागी करून घेणे बाबत.

महोदयः
वरील विषयास अनुसरून आपणास विनंती करण्यात येते की, प्रस्तुत महाविद्यालयातील विद्यार्थी आपण आयोजित केलेल्या श्रद्धेय शंकरावजी चव्हाण यांच्या जयंती निमित्त निबंध स्पर्धेत सहभागी होऊ इच्छितात तरी संबंधित विद्यार्थ्यांना सहभागी करून सहकार्य करावे.

| सहभागी विद्यार्थ्यांची यादी | | |
|---|---|---|
| 1. | कु. गायत्री कालिदास पांचाळ | बीए तृतीय वर्ष |
| 2. | कु. वैष्णवी राजेश पवार | बीए तृतीय वर्ष |
| 3. | श्री शिवा वाघमारे | बीए द्वितीय वर्ष |

O/C Received

प्राचार्य
PRINCIPAL
Rajiv Gandhi Mahavidyalaya
Mudkhed,Dist.Nanded

Co-ordinator
Dr.D.H.Mhetre
Head,
Dept.of Political Science,
Rajiv Gandhi Mahavidyalaya,
Mudkhed,Dist.Nanded.

Principal
Dr. A.T. Shinde
PRINCIPAL
Rajiv Gandhi Mahavidyalaya
Mudkhed,Dist.Nanded